**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३२/२०१९ मधील नि.क्र.७३ वरील आदेश**
**CNR No.MHSN02000410-2019**

**(संजय गॅब्रियल मोहीते वगैरे विरुध्द कुमार कोंडीबा आवळे वगैरे )**

१. अर्जदार यांनी मुळ अर्ज, रे. दि. मु. नं.४६१/२०१४ हा दावा काढून घेणेचा झालेला आदेश रद्द होवून सदरचा दावा पुन्हा फैलावर घेणेचा आदेश होणेसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा अर्ज प्रलंबित असताना जाबदार क्र.१०अ रामभाऊ उर्फ रामचंद्र नाना कांबळे हे दिनांक ०९/०३/२००५ रोजी बेथेलनगर, मिरज, जि. सांगली येथे अकस्मीकपणे राहत्या घरी मयत झालेले आहेत. जाबदार क्र.१०अ हे मयत झाल्यामुळे त्यांचे नाव कमी करुन अर्जात नमूद केल्याप्रमाणे त्यांचे वारस म्हणून प्रतिवादी क्र.१०अ/१ सामील करणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र.१०अ यांचे वारस रेकॉर्डवर आणण्यास १६ वर्षे १० महिन्यांचा विलंब झालेला आहे. सदरची माहीती वेळेत मिळाली नसल्याने सदरचा विलंब झालेला आहे. अर्जदार यांनी मुद्दामहून अगर जाणीवपूर्वक विलंब केलेला नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.१०अ च्या वारसांना रेकॉर्डवर घेण्यासाठी जो विलंब झालेला आहे तो माफ करुन मिळण्याकरीता, तसेच याकामी झालेला अबेंटमेंटचा आदेश रद्द होवून मिळणेकरीता त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. सदरहु अर्जाला अनुषंगून जाबदार यांनी त्याच अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे व त्यांनी अर्ज फेटाळण्याची मागणी केलेली आहे.

३. निर्विवादपणे दाव्याचे स्वरुप पाहता सदरचा अर्ज, रे. दि. मु. नं.४६१/२०१४ हा दावा पुन्हा फैलावर घेणेसाठी असल्यामुळे प्रतिवादी क्र.१०अ च्या सर्व वारसांना रेकॉर्ड वर घेणे व त्यांना पुराव्याची संधी मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे जर प्रतिवादी क्र.१०अ यांच्या वारसांना रेकॉर्डवर घेण्यासाठी जो १६ वर्षे १० महिन्यांचा विलंब झालेला आहे तो माफ केला नाही, तसेच त्यांच्या वारसांविरुध्द अबेटमेंटचा हुकुम

रद्द केला नाही तर त्यांचेविरुध्दची केस आपोआप संपुष्टात येईल व प्रतिवादी क्र.१०अ यांच्या वारसावर अन्याय होईल व त्यांना आर्थीक नुकसानीस सामोरे जावे लागेल. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने सदरचा अर्ज मंजूर करणे क्रमप्राप्त ठरते. परंतु सदरचा अर्ज मंजूर करत असताना प्रतिवादी क्र.१०अ यांचे खूप पूर्वी निधन झालेले आहे व त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी खूप उशीराने अर्जदार यांनी अर्ज दिलेला आहे ही बाब देखील दुर्लक्षीत करता येणार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करत असताना अर्जदार यांना कॉस्ट करणे आवश्यक आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्जदार यांचा नि.७३ कडील अर्ज १०००/– रुपये कॉस्ट सरकार जमा करण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार यांनी कॉस्टची रक्कम भरल्यानंतरच सदर हुकूमाची अमंलबजावणी करण्यात यावी.

३. उभय पक्षकारांनी हुकुमाची नोंद घ्यावी.

४. खर्चाबद्दल आदेश नाही.

Abhay Ashok Mehendale

Digitally signed by Abhay Ashok Mehendale
Date: 2023.02.17 16:28:54 +0530

**ठिकाण –सांगली.** **(अभय अ. मेहेंदळे)**

**दिनांक–१६.०२.२०२३** **दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, सांगली.**

## <u>प्र मा ण प त्र</u>

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | सतिश कृष्णा पाटील, |
| कोर्टाचे नाव | - | दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, सांगली. |
| आदेश घोषीत दिनांक | - | १६/०२/२०२३ |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक | - | १७/०२/२०२३ |